# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/08/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत 4 कि.मी अंतरावर सातगाव हिंगणा येथे दिनांक 16/08/2021 चे 16.00 वा. ते 17.45 वा. दरम्यान आरोपी 1) नंदु वाघमारे, वय 33 वर्ष, रा. सातगाव व 2) पिंन्टु जारूंडे, वय 42 वर्ष, रा. शिरूळ ता. जि. नागपुर यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून संगनमत करून जिवानीशी ठार करण्याचे उद्देशाने फिर्यादी/जखमी नामे— अतुल रंगलाल लालसरे, वय 30 वर्षे, रा. सातगाव ता. हिंगणा जि. नागपुर यांना पोटावर, हाताचे दंड, खांदयावर व अंगठयावर चाकुने मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 307, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री साखरकर मो नं 7350902100 हे करीत आहे.

### जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील मौजा पिपळा डाग बंगला येथे दिनांक 17/07/2021 चे 19.20 वा. दरम्यान फिर्यादी नामे— राममिलन जगमोहन सोनी, वय 48 वर्ष, रा. पिपळा डाग बंगला वार्ड क्र 02 हे तुलसी ज्वेलर्स नावाने असलेल्या आपल्या सोने चांदीचे दुकानात बसुन असतांना तेथे 03 अज्ञात आरोपी अंदाजे 20 ते 25 वर्ष वयोगटातील मोटारसायकलने दुकानासमोर येवुन दुकानासमोर गाडी उभी करून दुकानाचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीतांनी दुकानाचे रोलींग शटर आतुन अर्धवट खाली पाडुन त्याचे कडे असलेले देशी कटया सारखे हत्यार काढुन हातात काढल्याने दुकानातील फिर्यादी व ईतर यांच्या मनात भिती निर्माण झाल्याने त्यांनी दुकानाला लागुन असलेल्या घरात प्रवेश करून घराचा दरवाजा आतुन बंद केला. दुकानात असलेल्या जर्मन शेफर्ड कुत्र्याच्या भुकन्यामुळे अज्ञात आरोपी दुकानातील सामानाची चोरी न करता दुकानाबाहेर निघुन मोटारसायकलनी पळुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 393, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री सुर्यप्रकाश मिश्रा मो.क्र 9923694709 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 17 कि. मी. अंतरावरील मौजा कैसलापर रिठी शिवार येथे दिनांक 15/08/2021 चे 16.30 ते 16/08/2021 चे 08.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– गणेश देवराव फरकाडे, वय 25 वर्ष रा प्लॉट नं 15 वाघमारे ले आउट उमरेड यांचे मौजा केसलापार रिठी शेतामध्ये असलेल्या गोटफॉर्म गेटचे अज्ञात आरोपीने कुलुप अज्ञात आरोपीने तोडून 3 बकरे किंमती 30,000/–रू. व 02 पाट किंमती 14,000/–रू. असे एकुण किंमती 44,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजितसिंग ठाकुर 9423600556 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील मनसर बस स्टाप येथे दिनांक 15/08/2021 चे 02.00 ते 02.15 वा. सुमारास फिर्यादी नामे– रोशनी बाळकृष्ण गजभीये वय 28 वर्ष रा. वार्ड क्र. 5 आंबेडकर नगर मनसर यांचे बॅग मध्ये ठेवलेले सोन्याचे 10 ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र किंमती 30,000/– रूपये चा माल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उके बोंद्रे मो.न. 9881241089 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर